॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
"Dnyanteerth" Vishnupuri, NANDED 431 606 (Maharashtra)
Established on 17th September, 1994 Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited B++ Grade

MEETING AND ELECTION SECTION

| Phone : (02462) 215246<br>Fax : (02462) 215572 | Website:<br>srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|

जा.क्र. सभा व निवडणूक/२०२२–२३/370 दिनांक : ०३/१०/२०२२

# परिपत्रक

## मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादीबाबतची सविस्तर नियमावली

सर्व संबंधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत निवडणुकीसंदर्भात कार्यवाही सुरू असून, रविवार दिनांक ०९/१०/२०२२ रोजी विद्यापीठाच्या अधिसभेवर प्राचार्य गटामधून निवडून द्यावयाचे १० सदस्य व व्यवस्थापन प्रतिनिधी गटामधून निवडून द्यावयाचे ०६ सदस्यांसाठी जाहीर केलेल्या मतदान केंद्रावर सकाळी ठीक ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत मतदान होणार असून मतमोजणी दि. ११/१०/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून सुरू होणार आहे. त्या अनुषंगाने मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादीबाबत सविस्तर माहिती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीन्वये व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसूचनेत नमुद एकरूप परिनियम क्रमांक १ मधील तरतुदी च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मतदारांसाठी महत्वाच्या सूचना:–**

**(अ) मतपत्रिकेवर मत नोंदविणे:–**

१. प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल

२. मतदार त्याचे मत नोंदवताना:

(क) **''पसंतीक्रम''** या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करावयाचे आहे त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक १ नमूद करील.

(ख) याशिवाय, त्याला जेवढ्या अन्य उमेदवारांना मत द्यावयाचे असेल त्यांच्या संबंधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक २,३,४ असे सलग अंक नमूद करून दर्शवेल;

(ग) एका मतपत्रिकेवर दोन भाषेत पसंतीक्रम नमूद करू नयेत.

(घ) सर्व पसंतीक्रम एकतर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करावेत.

(ङ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करता येणार नाही.

३. मतदान केंद्रावर मतपत्रिकेवर पसंती क्रमांक नोंदविण्यासाठी जो पेन पुरविला जाईल त्याच पेनने पसंतीक्रम नोंदवावयाचा आहे.

४. मतपत्रिकेवर पसंती क्रमांक १ नोंदविणे आवश्यक आहे.

५. मतदानासाठी देण्यात येणाऱ्या सर्व मतपत्रिकांवर त्यांच्या पसंतीनुसार क्रमांकाची नोंद अंकी (जसे– १,२) स्वरूपात करावी. पसंतीदर्शक आकडे अंकातच इंग्रजी किंवा मराठी यापैकी कोणत्याही एका भाषेत परंतु एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करू नये. मतदाराने आपल्या पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत हे मतपत्रिकेवर नोंदविलेच पाहिजे. तसे न केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

## ब) मतपत्रिका अवैध ठरणे:–

मतपत्रिकेत जर .....

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ दर्शवण्यात आला नसेल,

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शविण्यात आला असेल,

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ व काही अन्य अंक एकाच उमेदवारांच्या नावासमोर दर्शविण्यात आले असतील;

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील;

किंवा

ङ) प्रथम पसंतीक्रम नोंदविण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल;

किंवा

च) मतदाराने निवडणुकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल;

किंवा

छ) निळया शाईखेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल;

किंवा

ज) मतदाराची पसंती दर्शविणाऱ्या अंकांमध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवणे किंवा फेरफार केला असेल,

किंवा

झ) मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविल्यावर सदर मतपत्रिका इतरांना दाखविल्यास मतपत्रिका बाद केली जाईल.

ञ) मतपत्रिकेवर फुलीची **(X)** किंवा **(✓)** बरोबरची खुण करून मत नोंदविलेले असल्यास,

ट) पसंती क्रमांक योग्य त्या दिलेल्या जागेवर नमूद केले नसल्यास.

ठ) पसंतीचे क्रमांक १,२,३,४ ऐवजी ०१,०२,०३,०४ असे क्रमांक नोंद केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.)

ड) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी मतपत्रिका अवैध ठरेल.

## क) मतदारांसाठी इतर सूचना:–

मतदाराने ओळखपत्र म्हणून खालीलपैकी एक कागदपत्र मतदानाच्या वेळी सोबत आणणे आवश्यक आहे.

१. प्राचार्य व व्यवस्थापन प्रतिनिधी गटाकरीता – नियोक्त्याने दिलेले ओळखपत्र, आधार कार्ड, निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र, पारपत्र, वाहन चालविण्याच फोटो असलेला परवाना

तरी सर्व संबंधितांनी उपरोक्त नियमावलीचे पालन करून, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यास विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी